# पुणे महानगरपालिका

## * स्थायी समिती *

## कार्यपत्रिका क्रमांक ५३

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २३/३/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र. १५३३

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी, कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/२/२०२१ ते दि.२८/२/२०२१ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. उआप–४/६०२४ दि.१२/३/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १५३४

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे फेब्रुवारी २०२१ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/९४९ दि.१६/३/२०२१ चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १५३५**

**मा.ॲड्.अब्दुल गफुर अ.पठाण, मा.सौ.परवीन शेख व मा.सौ.हमीदा सुंडके यांचे दि. १२/३/२०२१ चे पत्र.**

**स्थायी समिती दि. ९/३/२०२१ ठराव क्र. १४०९ फेरविचार करण्यात यावा व निरस्त करुन दप्तरी दाखल करण्यात यावा व स्थायी समिती ठराव क्र. १३०६ दि.२६/२/२०२१ रोजी करण्यात आलेला ठरावाची पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी.**

### माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र. १५३६

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे १६ ते २८ फेब्रुवारी २०२१ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि क्र.५/९१७ दि.१२/३/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १५३७

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/२/२०२१ ते दि.२८/२/२०२१ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/९१८ दि.१२/३/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १५३८

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६ फेब्रुवारी २०२१ ते २८ फेब्रुवारी २०२१ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/९९६ दि.१७/३/२०२१ चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. १५३९**

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील पेठ बाणेर या अे फॉर्म क्र. ००२६६८ व अे फॉर्म ००७०२९ सन २०१८–२०१९ मधील या मिळकतीची आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२३४५ दि. १२/३/२०२१ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २३ सन २०२०–२१ चा विचारासाठी.

**विषय क्र. १५४०**

बांधकाम विकास विभाग झोन क्र. २ व ३ कडील वडगाव बु., बालेवाडी, बाणेर येथील मान्य करण्यात आलेल्या संमतीपत्रापैकी माहे जुन–२० ते ऑक्टोंबर–२० मध्ये तपासणीसाठी उपलब्ध झालेल्या बांधकाम प्रस्तावांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२३६० दि. १५/३/२०२१ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २४ सन २०२०–२०२१ चा विचारासाठी.

**विषय क्र. १५४१**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ वडगांव बुद्रुक सन १९९९–२००० व २०००–२००१ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२४१६ दि. १७/३/२०२१ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २५ सन २०२०–२१ चा विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्र. १५४२**

रामनगर वारजे येथे मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अमोल एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे(टेंडर र.रु.३१,१४,१६१=९० पेक्षा १२.३३% कमी दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु. २७,३०,१८५=७३ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ३,२७,६२२=२८ असे एकुण र.रुपये ३०,५७,८०८=०१ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमे पर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचेजा.क्र. मआ/मलनि:/९९३ दि.१७/३/२०२१ चे पत्र.

**विषय क्र. १५४३**

प्रभाग क्र.२८ ब मध्ये स.नं.५८५ येथील क्रीडा संकुलाचे उर्वरित काम व दुरूस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४टेंडर्सपैकी ठेकेदार मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे(टेंडर र.रु.२६,२५,८१८=०० पेक्षा १८.१८% कमी) असल्याने त्यांचे कडून र.रु.२१,४८,४४४=२८ अधिक १२% जी.एस.टी. र.रुपये २,८९,४७८=१६ + FRP केबिन १८% जी.एस.टी. र.रुपये ३८,४३०/– अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ५,५६५=०० पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचेजा.क्र. मआ/भवन/९९४ दि.१७/३/२०२१ चे पत्र.

**विषय क्र. १५४४**

प्रभाग क्र.२ धानोरी स.नं.३६ येथील लाईट हाऊस व स्पर्धा परीक्षा केंद्राच्या इमारतीचे पहिल्या व दुसऱ्या मजल्याचे बांधकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. द साईराम कंन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे(टेंडर र.रु.१,९४,१०,२८३=०० पेक्षा १७.११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,६०,८९,१८३=५७ किंवा उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये २३,२९,२३३=९६ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २,७१,३४९=०४ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये १४,१३४/– पर्यंत अधिक निविदा अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचेजा.क्र. मआ/भवन/९९५ दि.१७/३/२०२१ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

विषय क्र. १५४५

मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि. १०/२/२०२१ चे पत्र.

पुणे पेठ वडगाव बुद्रुक स.न. १४ (पार्ट), १५ (पार्ट) (अपूर्वा मेडिकल ते क्राऊन बेकरी) मधून जाणारा रस्ता व पुणे पेठ वडगाव बुद्रुक स.न. १० (पार्ट) (खाडे गिरणी ते सनसिटी) मधून जाणारा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीकोनातून अपुरा पडत आहे. सदर रस्ता रुंद करणे आवश्यक आहे. म्हणून हा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१० (१) (ब) अन्वये रुंद करण्यात यावा.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १६/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १५४६

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१९–२० या आर्थिक वर्षातील संचलन तूट बाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२०९९ दि. १०/२/२०२१ ने केलेला लेखापरिक्षण अहवाल विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १६/३/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

## संकीर्ण

विषय क्र. १५४७

पुणे सोलापूर रस्त्याच्या रुंदीकरणातील बाधित व्यावसायिकांना पुर्वी भाडयाने दिलेल्या गाळयांच्या हस्तांतरणाचे धोरण ठराविणेस मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/९२९ दि. १५/३/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १५४८

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी रुग्णालये/नंर्सिग होम व्यवसायांना नोंदणी देताना व दिलेल्या नोंदणीचे विहीतमुदतीनंतर नुतणीकरण करताना सन २०२१–२०२२ या चालु आर्थिक वर्षापासुन शुल्क आकारणी करणेस खालील नमुद बाब क्र. १ ते ५ मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेस व बाब क्र. ६ ची अमंलबजावणी सन २०२१–२०२२ या चालु आर्थिक वर्षापासुन करणेकरीता मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९७१ दि. १६/३/२०२१ चे पत्र.

१) सुधारीत दराने परवाना फी व विलंब शुल्काची आकारणी दि.०१/०४/२०२१ पासुन करणेस.

२) दिलेल्या परवान्याचे नुतनीकरण परवान्याची मुदत सपुंष्टात आलेल्या वर्षाच्या पुढील तीन वर्षासाठी नुतनीकरण देणेस.

३) अधिसुचनेनुसार वार्षीक परवाना शुल्क/ फी आकारणी १ ते ५ खाटांसाठी रक्कम रु. ५०००/– व ५ पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रुषागृहाला पुढील प्रत्येकी ५ वाढीव खाटांच्या टप्यासाठी रक्कम रु. ५०००/– प्रति ५ खाटा प्रमाणे वाढीव शुल्क आकारणेस.

४) यापुर्वी सन २०२१ च्या पुढील कालावधीसाठी जुन्या दराने परवाना फी स्विकारुन नर्सिंगहोम परवाना नोंदणी व नुतणीकरण करुन दिलेल्या व्यवसायधारकांकडुन शासन अधिसुचनेत नमुद केलेल्या सुधारीत दराने होणारी परवाना फी ची फरक रक्कम वसुल करणेस.

५) शुश्रुषागृहाच्या दि. ०१/०४/२०२१ पासुन पुढील कालावधीसाठी नुतनीकरण करुन दिलेल्या आस्थापंनेस त्यांच्या पुढील कालावधीच्या नुतनीकरण कालावधीसाठी लगतचे मागील नुतनीकरण करुन देतेवेळी आकारण्यात आलेले परवाना शुल्क + त्यावर २५% वाढीव शुल्कासह पुढील प्रत्येक तीन वर्षीय नुतनीकरणासाठी फक्त शुल्क/ परवाना फीची आकारणी करणेस.

६) परवाना नुतनीकरणासाठी विलंब झाल्यास संबधीत व्यवसायधारकांन कडुन विलंब फी खालील तक्त्यात नमुद केलेल्या सुधारीत दराने आकारणी करुन वसुल करणेस .

| प्रचलित पध्दत | | सुधारीत दराने आकारणी दि.०१/०४/२०२१ पासुन करणेस | |
|---|---|---|---|
| बेडस् संख्या | विलंब फी प्रतिमहिना | बेडस संख्या | विलंब फी प्रतिमहिना |
| १० बेडस् पर्यंत | रु.०५/– | ०५ बेडस पर्यंत | र.रु. ५०/– |
| १० बेडस्च्या पुढे | र.१०/– | ०६ बेडस पासुन पुढे | र.रु. १००/– |

७) नव्याने प्रथम परवाना देतेवेळी ज्या आर्थिक वर्षात संबधीत व्यवसायधारकाचा प्रस्ताव दाखल होवुन मान्यता मिळेल ते आर्थिक वर्ष धरुन एकुण तीन वर्ष कालावधीसाठी परवाना देणेस .

विषय क्र. १५४९

“मा. बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नीला मालमत्ता कर माफी योजने”अंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये वास्तव्य करणाऱ्या सर्व माजी सैनिकांना मालमत्ता करातून सुट देणेसाठी खालील बाबीस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/९९२ दि. १७/३/२०२१ चे पत्र.

१. सर्व माजी सैनिकांच्या एका निवासी मिळकतीमधील मिळकतकरातील सर्वसाधारण करात सूट देणेस. तथापि बिगर निवासी मिळकतीस मालमत्ता करामध्ये सूट अनुज्ञेय राहणार नाही.
२. माजी सैनिकांच्या एका मिळकतीतील मिळकत कराअंतर्गत असलेल्या सर्व साधारण करात माफी देणेची सवलत ही दि.०१/१०/२०२० पासून लागू करणेस व इतर सर्व कर वसूल करणे.
३. माजी सैनिक हा निवृत्त वेतन धारक असावा किंवा त्यास युद्धा मध्ये अपंगत्व आलेले असावे.
४. माजी सैनिक यांनी प्रत्येक वर्षी हयात असल्याबाबत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे कार्यालयाकडून प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.
५. माजी सैनिक यांनी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी एक मिळकत क्रमांक नमूद करून मिळकत कराचे छायांकित प्रतीसह लेखी मागणी करणे आवश्यक असून, त्यासोबत निवृत्त वेतन घेत असलेले बँकेचे पत्र,जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांचेकडील ओळखपत्राची छायांकित प्रत देणे आवश्यक आहे.
६. वरील व्यतिरिक्त या योजनेच्या अंमलबजावणीच्या योजनेच्या दृष्टीने आवश्यक त्या बाबी/अटी समावेश करण्याचा मा. महापालिका आयुक्त यांना अधिकार राहील.
७. या बाबतची माहिती प्रसिद्ध करणेसाठी स्थानिक वर्तमान पत्रामध्ये प्रेसनोटचे माध्यमातून माहिती प्रसिद्ध करणेस व त्या प्रती येणारा खर्च RE 11G 103 (छ- कर आकारणी व कर संकलन प्रमुख यांचे कार्यालय,३-संकीर्ण) या अर्थशीर्षकावर टाकणेस.

विषय क्र. १५५०

पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागाकडील खराब झालेले टायर, ऑईल, स्पेअर पार्ट व निरस्त वाहनांची ई–लिलावाद्वारे विक्री केल्यानंतर या लिलावामधील भंगार मालाची डिलीव्हरी देणे कामी मा.स्थायी समितीतील दोन सदस्यांची नावे सुचविणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/९९८ दि.१७/३/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १५५१

पुणे महानगरपालिकेच्या सन २०१९–२०च्या अंदाजपत्रकात मा. स्थायी समितीने समाज कल्याणकारी योजना अंतर्गत पुणे शहरातील कायमस्वरूपी वास्तव्यास असणाऱ्या व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची राज्य सेवा पुर्व परीक्षा आणि केंद्रीय लोकेसेवा आयोगाची नागरी सेवा पुर्व परीक्षा उत्तीर्ण होवून मुख्य परीक्षेस गुणानुक्रमे पात्र ठरणाऱ्या प्रत्येकी १०० विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक संदर्भ ग्रंथ व पुस्तकांच्या खरेदीसाठी प्रत्येकी ५०००/–रूपये एकवेळ प्रोत्साहनपर निधी देणेबाबतची योजना सादर केली आहे. नागरी सेवा पुर्व परीक्षा देवून प्रशासकिय अधिकारी होण्यासाठी मोठ्या संख्येने प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सदरची योजना राबविण्याची संकल्पना असल्याचे अंदाजपत्रकात नमुद केले आहे. त्यासाठी पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील सन २०१९–२०२० चे अंदाजपत्रकातील ४ क युवक कल्याणकारी योजना निधी अंतर्गत FE14D144 या अर्थशिर्षकावर रक्कम रू. १०.०० लाख तरतूद उपलब्ध करणेत आलेली आहे.

MPSC व UPSC पुर्व परिक्षेत उत्तीर्ण होवून मुख्य परीक्षेस पात्र होणाऱ्या प्रत्येकी १०० विद्यार्थ्यांना पुस्तके खरेदीसाठी अर्थसहाय्य देणे ही योजना राबविणेकरीता व त्यासाठीचे धोरणात्मक निर्णय घेण्याकरीता खालील बाबीस मा. महिला बाल कल्याण समिती, मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे.

१. MPSC व UPSC पुर्व परिक्षेत उत्तीर्ण होवून मुख्य परीक्षेस पात्र होणाऱ्या प्रत्येकी १०० विद्यार्थ्यांना पुस्तके खरेदीसाठी अर्थसहाय्य देणे ही योजना राबविणेस. तसेच योजनेची अंमलबजावणी करणेकरीता मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांची मान्यता घेणेस.

२. पुणे शहरात कायमस्वरूपी वास्तव्यास असणाऱ्या आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची राज्य सेवा पुर्व परीक्षा तसेच केंद्रीय लोकेसेवा आयोगाची नागरी सेवा पुर्व परीक्षा उत्तीर्ण होवून मुख्य परीक्षेस पात्र ठरणाऱ्या प्रत्येकी १०० विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक संदर्भ ग्रंथ व पुस्तकांच्या खरेदीसाठी प्रत्येकी र.रू. ५०००/– एकवेळ अर्थसहाय्य dbt द्वारे देणेस. (१०० पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास पदवी अथवा पदव्युत्तर परिक्षेतील(शेवटचे)गुण विचारात घेणेत येतील).

३. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च समाज विकास विभागाकडील ४ क युवक कल्याणकारी योजना निधी अंतर्गत FE14D144 या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस.

४. सोबत जोडलेल्या परिशिष्ठ 'अ'मध्ये नमुद केलेल्या अटी व नियमानुसार सदर योजनेची कार्यवाही करणे.

५. सदर योजनेची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींबाबत निर्णय घेण्याचे, योजनांचे नियम अटीमध्ये कालानुरूप बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास देणेस.

तरी वरील निवेदन अवलोकन होवून MPSC व UPSC पुर्व परिक्षेत उत्तीर्ण होवून मुख्य परीक्षेस पात्र होणाऱ्या प्रत्येकी १०० विद्यार्थ्यांना पुस्तके खरेदीसाठी अर्थसहाय्य देणे ही योजना राबविणेकरीता व त्यासाठीचे धोरणात्मक निर्णय घेण्याकरीता वरील अ. क्र. १ ते ५ बाबीस व मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रा सोबतच्या परीशिष्ठ 'अ' मधील नियम अटीस **मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत** मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ / समाजविकास /५२३ , दि.२४/१२/२०२० चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. ६५ दि.१५/१/२०२१ विचारासाठी.

विषय क्र. १५५२

कर्वेनगर होमकॉलनी येथील समाज मंदिर येथे असलेले (१००० स्केअर फुट) मोकळ्या जागेत महिलांसाठी मोफत तायक्वांडो प्रशिक्षणासाठी Fighters Taekwondo Academy या संस्थेसाठी उपलब्ध करुन देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.सौ.वृषाली चौधरी व मा.माधुरी सहस्त्रबुध्दे यांचे दि.१५/१/२०२१ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. ६८ दि.१५/१/२०२१ विचारासाठी.

विषय क्र. १५५३

वारजे येथील स.नं.१३०/२ ॲमिनिटी स्पेस (एकूण ३००० स्केअर फुट) मध्ये बांधण्यात आलेल्या शेड मधील १५०० स्क्वेअर फुट जागेमध्ये महिलांसाठी मोफत तायक्वांडो प्रशिक्षणासाठी Fighters Taekwondo Academy या संस्थेमार्फत देण्यात येणार आहे.

तरी सदर संस्थेला नाममात्र दराने वरील जागा देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.सौ.वृषाली चौधरी व मा.सौ.श्वेता खोसे–गलांडे यांचे दि.१५/१/२०२१ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. ६९ दि.१५/१/२०२१ विचारासाठी.

विषय क्र. १५५४

पुणे महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत राबविणेत येत असलेल्या योजनांचा लाभ अनाथ व्यक्तींना देणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेकरिता खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साविवि/६०४, दि.१२/१/२०२१ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. ८५ दि.१०/२/२०२१ विचारासाठी.

१. पुणे महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत राबविणेत येत असलेल्या योजनांचा लाभ पात्र असलेल्या अनाथ व्यक्तींना देणेस

२. अनाथ व्यक्तींना कायमस्वरूपी वास्तव्याचे ठिकाण नसल्यामुळे महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण–२०१३/ प्र.क्र.१०९/का–३, दि.६/६/२०१६ मध्ये नमूद केले नुसार मा.उपआयुक्त (बालविकास) पुणे/आयुक्त, महिला व बालविकास पुणे यांनी प्रपत्रातील नमुन्यानुसार आयुक्त, महिला व बालविकास पुणे यांच्या छापील लेटर हेडवर अनाथ व्यक्तींना दिलेले अनाथ प्रमाणपत्र ग्राहय धरणेस

३. सदरचा खर्च समाज विकास विभागाकडील युवक कल्याणकारी योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, महिला बाल कल्याणकारी योजना व अपंग कल्याणकारी योजना या अर्थशिर्षकामधून करणेस

४. सदर विषयीची अंमलबजावणी करताना येणा–या अडचणीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिका–यास देणेस.

**विषय क्र. १५५५**

शासन निर्णयानुसार दिव्यांग बांधवाकरीता राखीव असलेल्या ५% निधी दिव्यांग बांधवाच्या खात्यावर जमा करणेबाबत योजनेची अंमलबजावणी व कार्यवाही करणेकरिता खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/समाजविकास/८५४,दि.२/३/२०२१ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. १०३ दि.९/३/२०२१ विचारासाठी.

१) कोविड–१९ प्रादुर्भावाच्या काळामुळे उद्धवलेल्या परिस्थितीमुळे ४०% पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या नागकिरकांच्या बँक खात्यामध्ये आर.टी.जी.एस.व्दारे रक्कम रु.२०००/–प्रमाणे सन २०२०–२०२१ या आर्थिक वर्षामध्ये एकदाच जमा करणेस
२) दिव्यांग नागरिकांना वरीलप्रमाणे रक्कम देण्याकरिता वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यास,अर्ज ऑनलाईन /छापील अर्जाव्दिारे मागविणेस,अर्जासोबत दिव्यांग प्रमाणपत्र,बॅकेत खाते असल्याबाबत तसेच आर.टी.जी.एस.व्दारे रक्कम जमा करण्यासाठी बॅकेच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत,पुणे शहर हद्दीत वास्तव्याचा पुरवा म्हणून आधार कार्ड/रेशनिंग कार्डची झेरॉक्स प्रत,इ.कागदपत्रे घेण्यास
३) सदरचा खर्च समाज विकास विभागाकडील सन २०२०–२०२१ या अर्थिक वर्षातील अंदाजपत्रकामध्ये ४ ड दिव्यांग कल्याणकारी योजना निधी अंतर्गत FE14E101(दिव्यांग कल्याणकारी योजना) या अर्थशिर्षकामध्ये खर्च टाकणेस

**विषय क्र. १५५६**

सन २०२०–२१ या अंदाजपत्रकामध्ये विविध सार्वजनिक संस्थांचे नावे मान्य झालेल्या देणगीची रक्कम अदा करणेबाबतच्या मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या सार्वजनिक संस्थांना खालील बाबींची पूर्तता केल्यानंतर रक्कम आदा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सा.प्र./४६४,दि.८/१२/२०२० चे पत्रावर झालेला विधी समिती सभा ठराव क्र. ३९ दि.८/३/२०२१ विचारासाठी.

१) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे पुणे मनपाचे दोन प्रतिनिधी अथवा शासकिय अधिकारी यांची नेमणूक करणेस
२) सदर संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर,संस्था ज्या वार्डामध्ये येत असेल त्या वार्डचे विद्यमान सभासद नेमणेस
३) मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये या संस्थेच्या नावामध्ये चूक/बदल झाला असल्यास,त्यांच्या नाव व पत्ता दुरुस्ती/बदल करणेस.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)